**मुंबई विद्यापीठ**

| निवडणूक विभाग<br>अत्यंत महत्वाचे |
|---|

e-mail- arelection@mu.ac.in
Tel. No. . ०२२.२२७० ८७१०
०२२.२२६९ ६१४७

क्र.नि.वि. ईएल/सिनेट-२५(२)(एल)/एसी-२९(२)(एफ)/४२-सी २०१० ८ ऑक्टोबर, २०१०

परिपत्रक-

विषय:- महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम २५(२) (एल) नुसार प्राचार्यामधून अधिसभेच्या व कलम २९(२) (एफ) नुसार प्राचार्यामधून विद्वत परिषदेच्या निवडणुकांसाठी मतदार यादी प्रसिध्द करणे.

उपरोक्त विषयास अनुसरुन प्राचार्याची मतदार यादी तयार करण्यासाठी परिपत्रक क्रमांक No.EL/(Senate)25(2)(*l*)&A.C.29(2)(*f*)/42 of 2010 दिनांक २ मार्च, २०१० आणि No.EL/(Senate)25(2)(*l*)&A.C.29(2)(*f*)/42-A of 2010 दिनांक १३ एप्रिल, २०१० अन्वये विहित नमुन्यात माहिती मागविण्यात आली होती.

प्राचार्याची मसुदा स्वरुपातील मतदार यादी परिपत्रक क्रमांक No.EL/(Senate)25(2)(*l*)&A.C.29(2)(*f*)42-B of 2010 दिनांक १५ जुलै,२०१० अन्वये प्रसिध्द करण्यात आली होती, त्यात दिनांक २६ जुलै, २०१० पर्यंत आक्षेप मागविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने आलेल्या आक्षेपांचा विचार करुन अधिसभेवरिल १८ जागा व विद्वत परिषदेवरिल ०८ जागांसाठी प्राचार्याची अंतीम मतदार यादी शुक्रवार दिनांक ८ ऑक्टोबर, २०१० रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे.

मतदार यादी खालील ठिकाणी परिनियम क्रमांक ३६२ नुसार विक्रीसाठी उपलब्ध आहे. (किंमत रु. २५/- प्रत्येकी)

१) सहायक कुलसचिव, निवडणूक विभाग, कक्ष क्रमांक ११०, पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२
२) उपकुलसचिव, सामान्य प्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, तळ मजला, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी परिसर, कालीना, सांताक्रुज (पूर्व), मुंबई - ४०० ०९८
३) सहायक कुलसचिव, रत्नागिरी उपकेंन्द्र, मुंबई विद्यापीठ, पी-६१, एम.आय.डी.सी., मिरजोळे, जिल्हा - रत्नागिरी - ४१५६३९.

संबंधितांचे लक्ष परिनियम क्रमांक ३६१ कडे वेधण्यात येत आहे.
परिनियम क्रमांक ३६१ खालिलप्रमाणे आहे.:-

*“The Vice-Chancellor shall have the authority to correct the rolls, if any omission or wrong entries be brought to his notice at least 15 clear days before the date of election. The Vice-Chancellor’s decision in the matter shall be final.”*

प्राचार्यामधून अधिसभेवरिल १८ व विद्वत परिषदेवरिल ०८ जागांसाठी निवडणुकीचा कार्यक्रम स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येत आहे.

दिनांक-
स्थळ- मुंबई

(ल.रा.माने)
स्थानापन्न कुलसचिव
तथा निवडणूक निर्णय अधिकारी

टिप :- (अधिनियम व परिनियमांचा अर्थ लावण्यासाठी इंग्रजी अधिनियम व परिनियमांचा संदर्भ घ्यावा)

election2010/marathi(2)/ndp

**मुंबई विद्यापीठ**

| निवडणूक विभाग<br>अत्यंत महत्वाचे |
|---|

e-mail- arelection@mu.ac.in
Tel. No. - ०२२.२२७० ८७१०
०२२.२२६९ ६१४७

क्र.नि.वि. इएल/सिनेट-२५(२)(एल)/एसी-२९(२)(एफ)/४२ डी २०१०
दिनांक ८ ऑक्टोबर, २०१०

**निवडणूक अधिसूचना-**

(एक) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम २५(२)(एल) मधील तरतूदीनुसार संलग्न/संचालीत/स्वायत्त महाविद्यालयांच्या प्राचार्यासाठी १८ जागा विद्यापीठाच्या अधिसभेवर निवडून देण्यासाठीची कार्यक्रम सुची (त्यापैकी दोन जागा महिलांसाठी आणि एक जागा विमुक्त जाती व भटक्या जमाती ;DT/NT) या प्रवर्गासाठी चक्रिय आरक्षणानुसार राखीव. विमुक्त जाती व भटक्या जमाती ;DTNT) या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर मागास प्रवर्गाचा (OBC) विचार करण्यात येईल.)

**आणि**

(दोन) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम २९(२)(एफ) मधील तरतूदीनुसार संलग्न/संचालीत/स्वायत्त महाविद्यालयांच्या प्राचार्यासाठी ०८ जागा विद्यापीठाच्या विद्वत परिषदेवर निवडून देण्यासाठीची कार्यक्रम सुची (त्यापैकी दोन जागा महिलांसाठी आणि एक जागा विमुक्त जाती व भटक्या जमाती ;DT/NT) या प्रवर्गासाठी चक्रिय आरक्षणानुसार राखीव. विमुक्त जाती व भटक्या जमाती या प्रवर्गातील उमेदवार उपलब्ध न झाल्यास इतर मागास प्रवर्गाचा ;OBC) विचार करण्यात येईल.)

परिनियम ३५५(ए) आणि महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ११५(२)(Xii) नुसार कुलगुरुंनी वरील मतदार संघासाठी दिनांक १५ नोव्हेंबर, २०१० ही निवडणुकीची तारीख निश्चित केली आहे.

१) अंतिम मतदार यादी परिपत्रक क्र. क्र.नि.वि. इएल/सिनेट-२५(२)(एल)/एसी-२९(२)(एफ)/४२-सी २०१० शुक्रवार दिनांक ८ ऑक्टोबर, २०१० अन्वये दिनांक ८ ऑक्टोबर, २०१० रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. अंतिम मतदार यादीप्रमाणे या निवडणुका घेण्यात येत आहेत.

२) विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या अंतिम मतदार यादीत नावे समाविष्ट असलेल्या प्राचार्यानाच या निवडणुकीत भाग घेता येईल.

३) परिनियम ३७५ ते ३७७ नुसार मतदान टपालाद्वारे होईल.

४) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम ४२(१) नुसार प्रत्येक प्राधिकरणाचा कालावधी १ सप्टेंबर, २०१० पासून पाच वर्षापर्यंत असेल.

......२/-

सदर निवडणुकीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.:-

| अ. क्र. | तपशील | वार, तारीख, व वेळ |
|---|---|---|
| १ | अंतिम मतदार यादी प्रसिध्द | शुक्रवार ८ ऑक्टोबर, २०१० |
| २ | अंतिम मतदार यादी शुध्दी पत्र (आवश्यकता भासल्यास) | गुरुवार २८ ऑक्टोबर, २०१० |
| ३ | नामनिर्देशन अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख | शनिवार ३० ऑक्टोबर, २०१० (दुपारी ४:०० पर्यंत) |
| ४ | नामनिर्देशन अर्ज छाननी | रविवार ३१ ऑक्टोबर, २०१० |
| ५ | नामनिर्देशन अर्ज मागे घेण्याची तारीख | सोमवार १ नोव्हेंबर, २०१० (दुपारी ४:०० पर्यंत) |
| ६ | मतदान पत्रिका मतदारांना पाठविण्याची तारीख | बुधवार ३ नोव्हेंबर, २०१० |
| ७ | निवडणुकीची तारीख, वार व वेळ | सोमवार १५ नोव्हेंबर, २०१० (सांयकाळी ५:०० पर्यंत) |
| ८ | मतमोजणी तारीख, वार व वेळ, | मंगळवार १६ नोव्हेंबर, २०१० (सकाळी ११:०० वाजता) |

५) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील कलम २४ (ए) अन्वये महाराष्ट्र शासनाने कोणत्याही प्रधिकरणावर/मंडळावर निवडुन येण्यासाठी/नामनिर्देशित होण्यासाठी दिनांक १४ सप्टेंबर, २००९ अंतर्गत विहीत केलेल्या पात्रता व शर्ती विद्यापीठाने परिपत्रक क्रमांक नि.वि.(६४)/३२/२०१०. दिनांक १७ फेब्रुवारी, २०१० अन्वये सर्व संबंधिताना पाठविल्या आहेत. सदर पात्रता व शर्ती बंधनकारक आहेत. विद्यापीठाच्या www.mu.ac.in या संकेत स्थळावर सदर परिपत्रक उपलब्ध आहे.

.....३/-

६)	मतदार याद्या खालील ठिकाणी उपलब्ध आहेत.	(किंमत रु.२५/- प्रत्येकी):-

अ) सहायक कुलसचिव, निवडणूक विभाग, कक्ष क्रमांक
११०,पहिला मजला, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२

ब) उपकुलसचिव, सामान्य प्रशासन विभाग, डॉ. बाबासाहेब
आंबेडकर भवन, तळ मजला, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी परिसर, कालीना, सांताक्रुज (पूर्व), मुंबई - ४०० ०९८

क) सहायक कुलसचिव, रत्नागिरी उपकेंन्द्र, मुंबई
विद्यापीठ, पी-६१, एम.आय.डी.सी., मिरजोळे, जिल्हा - रत्नागिरी - ४१५६३९

७)	परिनियम ३६१ नुसार कुलगुरुंना मतदार यादीत दुरुस्ती करण्याचे अधिकार आहेत.परिनियम ३६१ खालीलप्रमाणे आहे:-

*"The Vice-Chancellor shall have the authority to correct the rolls, if any omission or wrong entries be brought to his notice at least 15 clear days before the date of election. The Vice-Chancellor's decision in the matter shall be final."*

८)	विहीत नमुन्यातील नामनिर्देशन अर्ज परिपूर्णरित्या भरणे आवश्यक आहे. अपूर्ण अर्ज फेटाळण्यात येतील.

९)	विहीत नमुन्यातील नामनिर्देशन अर्जासाठी मतदाराने खालील ठिकाणी अर्ज करावा.:-

(अ) कुलसचिव-तथा-निवडणुक निर्णय अधिकारी, निवडणुक
विभाग, कक्ष क्रमांक ११०, पहिला मजला, फोर्ट,	मुंबई - ४०० ०३२.

(ब) सहायक कुलसचिव, रत्नागिरी उपकेंन्द्र, मुंबई
विद्यापीठ,पी-६१, एम.आय.डी.सी., मिरजोळे, जिल्हा -
रत्नागिरी - ४१५६३९

१०)	उमेदवाराने लेखी विनंती करुन आणि संबंधिताच्या मान्यतेने अधिकृत केलेल्या प्रतिनिधीस नामनिर्देशन अर्जाच्या छाननीस उपस्थीत राहता येईल, परंतु त्या प्रतिनिधीचे नांव त्या मतदार संघाच्या यादीत असणे आवश्यक आहे.

११)	मतदान करण्याची पध्दत आणि खातरजमा (attestation)	याबाबतच्या सुचना मतदान पत्रिके सोबत पाठविण्यात येतील.

दिनांक-	(ल.रा.माने)
स्थळ- मुंबई	स्थानापन्न कुलसचिव
तथा निवडणूक निर्णय अधिकारी